# मुख्य वनसंरक्षक (प्रा) यवतमाळ, वनवृत्त यवतमाळ यांचे कार्यालय

**डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, पळसवाडी कॅम्प, दारव्हारोड, यवतमाळ-४४५००१**

फोन नं.०७२३२-२४२८९४/२४२१९४ फॅक्स-०७२३२-२४२१९४ ई-मेल-conytlyvt@gmail.com/ ccftyavatmal@mahaforest.gov.in


विषय:- वन(संवर्धन) अधिनियम १९८० अंतर्गत मौजे-
सोनाळा ता. मालेगाव जि. वाशिम येथील श्री.
राजु काशीराम कदम यांचे शेतात सिंचनाकरीता
खाजगी पाईप लाईन टाकणेकरीता ०.०२० हे.
वनक्षेत्र वळतीकरणाचा प्रस्ताव.

क्र.मुवसंय/कक्ष-१०/वसं/ ६४५५/२०१५-१६
यवतमाळ ४४५००१ दि. ०१/ ०३/२०१६.

संदर्भ- उपवनसंरक्षक, अकोला यांचेकडील पत्र क्र.सर्व्हे/ २५३३ दि.२५.०२.२०१६.

---ooo---

उपवनसंरक्षक, अकोला यांचेकडील संदर्भिय पत्रान्वये प्राप्त विषयांकीत प्रस्तावाची तपासणी केली असता खालीलप्रमाणे त्रुटया निदर्शणास आलेल्या आहेत.

**Online प्रस्तावातील त्रुटया.**

१. भाग-१ ए-२ (xiii) मध्ये मागील सादर केलेल्या प्रस्तावांबाबत सविस्तर माहीती नमुद करणे आवश्यक आहे.
२. श्री. राजु काशीराम कदम यांनी त्यांचे वतीने अर्जदार म्हणुन श्री. शेषराव वानखेडे रा. सोनाळा ता. मालेगाव जि. वाशिम यांना अधिकृत केलेले असल्यामुळे भाग-१ ए-३ मधील नावात दुरुस्ती करणे आवश्यक आहे.
३. भाग-१ सी (iii) मध्ये जोडलेल्या नकाशात एकुण वनक्षेत्र, वळतेकरणासाठी प्रस्तावीत वनक्षेत्र व त्याचे lat-long वेंगवेगळया रंगाने संदर्भ सुचीसह दर्शवावेत.
४. भाग-१ डी (i) प्राजेक्ट नोटवर तारीख नमुद करावी.
५. भाग-१ के मध्ये जिल्हाधिकारी, वाशिम यांचेकडील FRA प्रमाणपत्र आवश्यक सहपत्रासह जोडावे.

**स्थळ प्रत प्रस्तावातील त्रुटया.**

१. प्रस्तावातील दस्तावेजास पान क्र. देतांना बहुतांश पानांना क्रमांक दिलेले नाहीत. प्रस्तावास अ.क्र.१ ते ५७ मुद्यांची सुधारीत तपासणी सुची जोडावी व त्यानुसार पान क्रमांक व आवश्यक माहीती नमुद करावी.
२. पान क्र. ८ व ९ येथे certificate is enclosed असे नमुद केलेले आहे, तेथे पान क्र. नमुद करावे.
३. पान क्र.२६ वरील गट क्र.२२ च्या संगणकीकृत ७/१२ मध्ये खाडाखोड करुन गट क्रमांक बदलला आहे, बरोबर असलेला ७/१२ जोडावा व तोच ७/१२ आंग्ल भाषेत भाषांतरीत करुन पान क्र.२८ वर जोडावा.
४. पान क्र.३३, ३४ व त्यापुढील पान क्रमांक न दिलेली १० पाने आंग्ल भाषेत भाषांतरीत करुन जोडावीत.
५. पान क्र.३६, ३७ मध्ये मजकुर भरलेला नाही तथापी त्यावर उपवनसंरक्षक यांची स्वाक्षरी नाही.

प्रस्तावातील वरीलप्रमाणे त्रुटयांची पुर्तता करुन परिपुर्ण व अचुक प्रस्ताव तात्काळ या कार्यालयास सादर करावा. सबब त्रुटीपुर्ततेसाठी प्रस्तावाच्या ४ प्रती यासोबत परत पाठविण्यात येत आहे.

सहपत्र-वरीलप्रमाणे.

1/03/2016

मुख्य वनसंरक्षक (प्रा)
यवतमाळ

प्रति,
उपवनसंरक्षक,
अकोला.

प्रतिलीपी- श्री. राजु काशीराम कदम रा. सोनाळा ता. मालेगाव जि. वाशिम यांना माहीती व आवश्यक कार्यवाहीस रवाना.